सकाळ



आळेफाटा (ता. जुन्नर) : आळे येथील जाधव महाविद्यालयातील निवड झालेले विद्यार्थी.

# आळेच्या २० विद्यार्थ्यांची 'सायबर सुरक्षा' उपक्रमासाठी निवड

आळेफाटा : आळे (ता. जुन्नर) येथील ज्ञानेश्वर ग्रामोन्नती मंडळ संचलित बाळासाहेब जाधव महाविद्यालय तसेच क्विक हिल फाउंडेशन व महाराष्ट्र सायबर विभाग यांच्या वतीने विद्यालयाच्या सामंज्यस्य कराराअंतर्गत बीसीए, बीसीएस विभागातील द्वितीय व तृतीय वर्षातील २० सायबर स्वयंसेवकांची 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमासाठी निवड करण्यात आली असून, हे विद्यार्थी परिसरात सायबर जागरूकता अभियान राबवणार आहेत. निवड प्रक्रियेसाठी क्विक हिल फाउंडेशनच्या सी. एस. आर एक्झिक्युटिव्ह गायत्री पवार, विभागीय समन्वयक क्षितिजा शिर्के या उपस्थित होत्या. पवार यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेविषयी मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. प्रवीण जाधव यांनी विद्यार्थ्यांना या अभियानात सहभागी होऊन काम करण्याचे आवाहन केले. या वेळी या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष अजय कुऱ्हाडे, उपाध्यक्ष सौरभ डोके, बाळासाहेब जाधव, अर्जुन पाडेकर, अरुण हुलवळे, संचालक भाऊ कुऱ्हाडे, किशोर कुऱ्हाडे, बबनरावजी सहाणे, उल्हास सहाणे, बाबू कुऱ्हाडे, शिवाजी गुंजाळ, जीवन शिंदे, दिनेश सहाणे, कैलास शेळके आदींनी अभिनंदन केले. प्रा. नूतन जोशी, प्रा. सर्जेराव थोरात, प्रा. अश्विनी गागरे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले.

Pune, District-Today
06/09/2023 Page No. 4